**Maharashtra University of Health Sciences, Nashik**
**Nursing Faculty**

**Information of Subject-wise Intake as per College & University Recognition**
**Permitted Seat-Matrix Chart for Academic Year 2024-2025**

**Name of College: -SVJCT's Samarth Nursing College, Kasarwadi**

| UG Degree/PG Degree | | Intake as per University /Council | Max. Seats Permitted by MUHS as per Teacher: Student Ratio (1:5) |
|---|---|---|---|
| | | Degree | Degree |
| **UG Degree :** B. Sc (Nursing) | | 50 | NA |
| P. B. B. Sc (Nursing) | | 20 | NA |
| **PG Degree :** M.Sc. (Nursing) Total Aggregate | | 23 | |
| Community Health Nursing | | 05 | 05 |
| Obstetric and Gynecological Nursing | | 04 | 04 |
| Child Health Nursing | | 05 | 05 |
| Psychiatric Nursing/Mental Health Nursing | | 05 | 05 |
| **Medical Surgical Nursing** | Cardio Vascular & Thoracic Nursing | 00 | 00 |
| | Critical Care Nursing | 00 | 00 |
| | Oncology Nursing | 04 | 04 |
| | Neurosciences Nursing | 00 | 00 |
| | Nephro- Urology Nursing | 00 | 00 |
| | Orthopaedic Nursing | 00 | 00 |
| | Gastro Enterology Nursing | 00 | 00 |
| | | | |
| | | | |

Date: 29/01/2025

Samarth Nursing College S.V.J.C.T.S.

Dean/ Principal Stamp & Signature

Principal
Samarth Nursing College
Kasarwadi, Sawarde,
Tal. Chiplun, Dist. Ratnagiri 415606

श्री. विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्टचे समर्थ नर्सिंग कॉलेज, श्रीक्षेत्र डेरवन, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

एम. एस. सी. (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग,**
शासन निर्णय क्रमांक : एनयुआर-२०१०/प्र.क्र.१६७/१०/शिक्षण-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक:- ०२ फेब्रुवारी, २०१२

वाचा:- सचिव, भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.०२/ओसीटी/२०११, दिनांक २०.१०.२०११

प्रस्तावना - श्री. विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्टचे समर्थ नर्सिंग कॉलेज, श्रीक्षेत्र डेरवन, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी या संस्थेस संदर्भाधीन पत्रान्वये केंद्रिय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाकरीता मेडीकल सर्जिकल नर्सिंग व ऑब्स्ट्रीक ॲण्ड गायनॉकालॉजीकल नर्सिंग या दोन विषयात प्रत्येकी ०४ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली आहे. केंद्र शासनाने दिलेल्या मंजूरीनुसार या संस्थेस सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाकरीता उपरोक्त दोन विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- केंद्रिय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन याद्वारे श्री. विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्टचे समर्थ नर्सिंग कॉलेज, श्रीक्षेत्र डेरवन, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी या संस्थेस सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षाकरीता मेडीकल सर्जिकल नर्सिंग व ऑब्सेट्रीक ॲण्ड गायनॉकालॉजीकल नर्सिंग या दोन विषयात प्रत्येकी ०४ विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटीं व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देत आहे:-

अटी व शर्ती:-

१) या महाविद्यालयातील मेडीकल सर्जिकल नर्सिंग व ऑब्सेट्रीक ॲण्ड गायनॉकालॉजीकल नर्सिंग या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार प्रत्येकी ०४ एवढी राहील.
२) राज्य शासन / केंद्र शासन / मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपद्धत अवलंबिण्यात यावी.
३) शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.
४) केंद्र शासन, केंद्रिय परिचर्या परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी नर्सिंग अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.



True Copy
Samarth Nursing College
Kasarwadi, Sawarde, Tal. Chiplun,
Dist. Ratnagiri 415606

५) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७) शासकीय नर्सिंग तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नये.

९) केंद्रिय परिचर्या परिषदेने दिलेली परवानगी सन २०११-१२ या एका वर्षासाठी असल्याने संस्थेने पुढील वर्षाचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्रिय परिचर्या परिषदेच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१०) संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

२. सदर आदेश केंद्रिय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भीत दि. २१.१०.२०११ च्या पत्रान्वये दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(वि.ला.ढोले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्राचार्य, श्री. विठ्ठलराव जोशी चॅरिटीज् ट्रस्टचे समर्थ नर्सिंग कॉलेज, श्रीक्षेत्र डेरवन, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६०६.
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती / शिक्षण शुल्क समिती, २०५, गव्हर्नमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रा (पू.) मुंबई-५१.
मा.मंत्री (वै.शि.)/ मा.राज्यमंत्री (वै.शि.)यांचे स्वीय सहायक
निवडनस्ती (शिक्षण-२)

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्टचे समर्थ नर्सिंग कॉलेज, सावर्डा, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी

---

एम.एस्सी (नर्सिंग) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचा नवीन विषय सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक.एनयुआर १४१९/प्र.क्र.२४३/१९/शिक्षण-२

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई ४०० ००१

दिनांक:-०२ ऑगस्ट,२०१९

संदर्भ:- १) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/पीजी/पी-५/१२५४/२०१८, दिनांक २७/१२/२०१८

२) समक्रमांक पत्र दिनांक ०९/०१/२०१९

३) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र.एनयुआर/एसव्हीजेसीटीचे, समर्थ नर्सिंग कॉलेज, मु.पो.सावर्डा, ता.चिपळूण,जि.रत्नागिरी/एम.एस्सी/सक्षमता तपासणी/ खाजगी/ई/१८, १०३१५, दिनांक ०१/०७/२०१९

**प्रस्तावना** :- श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्टचे समर्थ नर्सिंग कॉलेज, सावर्डा, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी या संस्थेस पेडीयाट्रिक नर्सिंग, सायकॅट्रिक (मेन्टल) हेल्थ नर्सिंग, कम्युनिटी हेल्थ नर्सिंग हे एम.एस्सी (नर्सिंग) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे तीन विषय प्रत्येकी ०५ इतक्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्याचा प्रस्ताव वरील संदर्भ क्रमांक १ च्या पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शिफारशीसह शासनास प्राप्त झाला होता. त्यानुसार सक्षमता तपासणी करुन संदर्भाधीन क्रमांक ३ च्या पत्रान्वये संचालनालयाकडून शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असल्याने एम.एस्सी (नर्सिंग) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**- श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्टचे समर्थ नर्सिंग कॉलेज, सावर्डा, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी या संस्थेस सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून पुढील नमूद केलेल्या विषयात एम.एस्सी. (नर्सिंग) हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | अभ्यासक्रम/विषय | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| | पेडीयाट्रिक नर्सिंग | ०५ |
| | सायकॅट्रिक (मेन्टल) हेल्थ नर्सिंग | ०५ |
| | कम्युनिटी हेल्थ नर्सिंग | ०५ |

२. सदर मान्यता ही पुढील अटी व शर्तीस अधीन राहील:-

१. सदर महाविद्यालयातील पेडीयाट्रिक नर्सिंग, सायकॅट्रिक (मेन्टल) हेल्थ नर्सिंग, कम्युनिटी हेल्थ नर्सिंग या तीन विषयातील एम.एस्सी. नर्सिंग पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची विद्यार्थी प्रवेशक्षमता प्रत्येकी ०५ (पाच) इतकीच राहिल.

२. राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय/ मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

३. शासकीय नियम/कायदा तथा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्क आकारणीसाठी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी एम.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९९८ चा ६) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७. शासकीय नर्सिंग किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकांस तो सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नये.

९. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

१०. महाराष्ट्रआरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी संस्थेस विद्यार्थी प्रवेश करण्यास परवानगी देण्यापूर्वी संस्था विहित मानकांची पूर्तता करीत आहे याची खात्री करावी.

११. संस्थेने उपरोक्त नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर सदर संस्थेत विद्यार्थी प्रवेश करावेत.

३. सदर आदेश हे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(अजित सासुलकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय,मुंबई
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई
सचिव,शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई
प्राचार्य, श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्टचे समर्थ नर्सिंग कॉलेज, सावर्डा, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी
निवडनस्ती (शिक्षण-२)

True Copy
Samarth Nursing College
Kasarwadi, Sawarde, Tal. Chiplun,
Dist. Ratnagiri 415606

श्री विठ्ठलराव जोशी चॅरीटीज ट्रस्ट मुंबई या संस्थेस सावर्डे ता.चिपळूण जि.रत्नागिरी येथे पोस्ट बेसिक बी.एस.सी.नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक- एनयुआर-१३०७/प्र.क्र.२२/०७/शिक्षण-१

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक :- ३१ ऑगस्ट, २००७

वाचा:- १) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीबी/१४२३/२००६, दिनांक २८.१२.२००६

२) या विभागाचे समक्रमांकाचे दिनांक २९.१.२००७ चे आवश्यकता प्रमाणपत्र व दि.१३.२.२००७ चे पत्र.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ.१८-१९/४०२३-आयएनसी, दिनांक २२.०८.२००७

४) विश्वस्त श्री.विठ्ठलराव जोशी चॅरीटीज ट्रस्ट मुंबई यांचे दि २९.८.२००७ चे पत्र.

प्रस्तावना:- महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये श्री. विठ्ठलराव जोशी चॅरीटीज ट्रस्ट मुंबई या संस्थेस समर्थ नर्सिंग कॉलेज,सावर्डे ता.चिपळूण जि.रत्नागिरी येथे ३० विद्यार्थी क्षमतेचे पोस्ट बेसिक बी.एस.सी.नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यानुसार शासनाने सदर संस्थेस संदर्भ क्र. २ अन्वये शासनाचे आवश्यकता प्रमाणपत्र प्रदान केले होते. भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी श्री. विठ्ठलराव जोशी चॅरीटीज ट्रस्ट मुंबई या संस्थेस संदर्भ क्र. ३ अन्वये सन २००७-०८ साठी २० विद्यार्थी क्षमतेचे नवीन पोस्ट बेसिक बी.एस.सी. नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता दिली आहे. भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेली मान्यता लक्षात घेऊन सदर संस्थेस समर्थ नर्सिंग कॉलेज,सावर्डे ता.चिपळूण जि.रत्नागिरी येथे पोस्ट बेसिक बी.एस.सी.नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:- भारतीय परिचर्या परिषद,नवी दिल्ली यांनी संदर्भ क्र.३ च्या पत्रान्वये श्री. विठ्ठलराव जोशी चॅरीटीज ट्रस्ट मुंबई या संस्थेस समर्थ नर्सिंग कॉलेज,सावर्डे ता.चिपळूण जि. रत्नागिरी येथे सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षात २० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे पोस्ट बेसिक बी.एस.सी.नर्सिंग महाविद्यालय सुरू करण्यास दिलेली मान्यता विचारात घेवून सदर संस्थेस सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षासाठी २० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे पोस्ट बेसिक बी.एस.सी. (नर्सिंग) महाविद्यालय सुरू करण्यास त्यांच्या पत्रातील त्रुटींची पुर्तता करण्याच्या अधीनेते तसेच खालील अटी व शर्तींच्या अधिनतेने याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. अटी व शर्ती :-

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश राज्य शासन/केंद्र शासन/मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालययांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर प्रवेशाकरिता कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, [illegible] आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक [illegible] यांनी पोस्ट बेसिक बी.एस.सी.नर्सिंग अभ्यासक्रमासाठी केलेल्या नियमांचे व मानकांचे [illegible] संस्थेस बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, मुंबई यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन प्रोव्हिबिशन ऑफ कॅपिटेशन फी ॲक्ट, १९९७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम/कायदा मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपद्धती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) संस्थेने त्यांच्या संस्थेत शासकीय वैद्यकीय / परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांस नियत वयोमान सेवा निवृत्ती अथवा स्वेच्छासेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही याबाबतचे रू.५०/- च्या स्टँप पेपरवरील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र शासनास सादर करणे आवश्यक राहील.

७) भारतीय परिचर्या परिषद,नवी दिल्ली महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी पोस्ट बेसिक बी.एस.सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने दरवर्षी परिषदेची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्था आवर्ती / अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने शासनास दिले पाहिजे.

१०) संस्थेने पोस्ट बेसिक बी.एस.सी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

११) सदर मान्यता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तपासणी अहवालाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

१२) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करण्यात येऊ नयेत.

१३) संस्थेने गुणवत्तेवर आधारीत प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश [illegible] मुंबई यांचेकडून मंजूर घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शिक्षण शुल्क समितीकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

सदर आदेश भारतीय परिचर्या परिषद नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेनुसार, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मुकुंद कांबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई.
मा.उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव मंत्रालय, मुंबई.
सचिव, भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली

Suradkar/GR-BSC/20

True Copy
Samarth Nursing College
Kasarwadi, Sawarde, Tal. Chiplun,
Dist. Ratnagiri 415606

बी.एस्सी. (नर्सिंग) अभ्यासक्रमास मान्यता देण्याबाबत.

श्री. विठ्ठलराव जोशी चॅरिटिज ट्रस्ट,दादर(प), मुंबई संचलित समर्थ नर्सिंग कॉलेज, मु. पो. सावरडा, ता.चिपळूण, जि. रत्नागिरी

# महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक: एनयुआर-२०१७/प्र.क्र.५९/१७/शिक्षण-१

९ वा मजला, नवीन मंत्रालय,गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१.

दिनांक: १५ नोव्हेंबर, २०१८

**वाचा** :

१) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/ पीबी/युजी/१३२८/२०१६, दिनांक ३०.१२.२०१६

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्र.एनयुआर-२०१७/प्र.क्र.२१२/१७/शिक्षण-१, दि. २८ फेब्रुवारी, २०१८.

३) संचालक, वैद्यकीय शिक्षण यांचे पत्र क्र.एनयुआर/श्री.वि.जोशी चॅरि.ट्रस्ट संचलित समर्थ न. कॉ./चिपळूण/बी.एस्सी(न)/तपासणी अहवाल/९६४३/ खाजगी/ई/१८,दि.१५.०९.२०१८.

**प्रस्तावना:**

श्री. विठ्ठलराव जोशी चॅरिटिज ट्रस्ट,दादर (प), मुंबई संचलित समर्थ नर्सिंग कॉलेज, मु. पो. सावरडा, ता.चिपळूण, जि. रत्नागिरी या संस्थेचा बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.(१) येथील पत्रान्वये महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडून शासनास प्राप्त झाला होता. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्तावाची शिफारस केली होती. संदर्भ क्र.(२) येथील शासन निर्णयातील तरतूदीनुसार, सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(३) येथील पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सक्षमता तपासणी समितीने उक्त संस्था बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास सक्षम असल्याची शिफारस केली आहे. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांचेकडून प्राप्त सदर शिफारस विचारात घेऊन, उक्त संस्थेस शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.एस्सी (नर्सिंग) अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी संदर्भ क्र. (३) अन्वये सक्षमता तपासणी समितीच्या अहवालाच्या आधारावर केलेली शिफारस विचारात घेऊन, श्री. विठ्ठलराव जोशी चॅरिटिज ट्रस्ट,दादर (प), मुंबई संचलित समर्थ नर्सिंग कॉलेज, मु. पो. सावरडा, ता.चिपळूण, जि. रत्नागिरी या संस्थेस सन २०१८-१९ साठी ५० (पन्नास) विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह बी.एस्सी.(नर्सिंग) अभ्यासक्रम सुरू करण्यास पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून याव्दारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :**

१) सदर अभ्यासक्रमाचे प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

२) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व राज्य शासन यांनी बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

३) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी घातलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट क्र.VI १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) शासकीय नियम / अधिनियमाच्या आधारे तसेच मा.सर्वोच्च व मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपद्धती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

६) संस्था, त्यांच्या संस्थेत शासकीय वैद्यकीय / दंत / परिचर्या महाविद्यालयातील शिक्षकांना ते नियत वयोमान सेवानिवृत्त अथवा स्वेच्छा सेवानिवृत्त असल्याखेरीज कोणत्याही परिस्थितीत नोकरीत ठेवणार नाही.

७) भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमासाठी विहित केलेल्या प्रमाणकांची योग्यरित्या पूर्तता करून संस्थेने दरवर्षी परिषदेची मान्यता मिळविणे आवश्यक आहे.

८) संस्था आवर्ती / अनावर्ती स्वरूपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही.

९) सदर मान्यता संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या तपासणी अहवालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१०) संस्थेने बी.एस्सी. नर्सिंग महाविद्यालयास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची संलग्नता मिळाल्यानंतरच विद्यार्थी प्रवेशित करावेत.

११) संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेशित करु नयेत.

१२) संस्थेला गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरणाकडून करुन घेणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८, कलम ६४(५) नुसार शासनास प्रदत्त अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. श्री.पुं. कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव, भारतीय परिचर्या परिषद, कोटला रोड, नवी दिल्ली ११० ००२.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
७. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
८. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
९. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई.
१०. अध्यक्ष/सचिव, श्री. विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट, सी-२८, सुयश अपार्टमेंट, गोखले रोड, दादर (प), मुंबई-४०० ०२८.
११. अवर सचिव, शिक्षण-२, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवडनस्ती (शिक्षण-१).

True Copy

Samarth Nursing College
Kasarwadi, Sawarde, Tal. Chiplun,
Dist. Ratnagiri 415606

Fax No. 23236140
Phone Nos. 23235570, 23235619

**INDIAN NURSING COUNCIL**
**COMBINED COUNCILS BUILDING**
**KOTLA ROAD, TEMPLE LANE**
**NEW DELHI - 110 002**

File No. 02/JUN/2011 Date:23/06/2011

To,

The Principal,
Samartha Nursing College,
B K L W Hospital & Research Centre, T Post Sawarda, Dervan
Tal- Chiplun,dist. Ratnagiri-415606, Maharasthra

Subject: Status of Samartha Nursing College,, B K L W Hospital & Research Centre, T Post Sawarda, Dervan, Tal-Chiplun,dist. Ratnagiri-415606, Maharasthra - Reg.

Sir/Madam,

The Indian Nursing Council conducted inspection of your institution for P B BSC(N) programme on 30-31/05/2011

The Institution is **permitted/Suitable for P B BSC(N)** programme with an intake of **20 (Twenty)** seats subject to the approval of State Nursing Council and University/Board for 2011-12 academic year.

True Copy
Samarth Nursing College
Kasarwadi, Sawarde, Tal. Chiplun,
Dist. Ratnagiri 415606

Yours faithfully,

SECRETARY